२० प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन गंगापूर छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** गंगापूर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0265  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/05/2024 03:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 28/05/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 7  **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/05/2024
      **Time From (वेळेपासून):** 18:32 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 19:15 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 29/05/2024  **Time (वेळ):** 03:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 003
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/05/2024 03:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** डिवायसी आफिस गंगापुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

9. Particulars of
S.No

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गणेश ऊर्फ पप्पु विनायक जाधव

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा शेंदुरवादा,गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा शेंदुरवादा,गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल मुलचंद राठोड पोलीस | | | 1. उपवि पोलीस अधि कार्यालय गंगाप,गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | लक्ष्मीकांत हरिचंद्र सपकाळपोल | | | 1. उपविपोअधि कार्यालय गंगापुर, गंगापूर,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 3 | अनोळखी 1 | | | |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 30 भारतीय चलनी नोटा ज्यास अथ्रोसिन पावडर लागलेली. | 15,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 28/05/2024

मी गणेश ऊर्फ पप्पु विनायक जाधव, वय 38 वर्ष, व्यवसाय शेती/वाळु वाहतुक, रा.शेंदुरवादा ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9881573232
मी वरील प्रमाणे असुन दि.27/05/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छ.संभाजीनगर येथे समक्ष दोन पंचासमक्ष हजर राहुन तक्रार दिली होती की, दिनांक 27/05/2024 रोजी माझा मो.नं. 9881573232 वर मो. नं.8972636886 चे दोन मिसकॉल आले. त्यामुळे मी मो.नं.8972636886 वर फोन केला तर त्या नंबरवरुन मी पोलीस सुनिल राठोड बोलतोय डीवायएसपी ऑफीस गंगापूर येथून, तुमची वाळुची गाडी रात्रीला चोरुन वाळु घेऊन चाललीय तुमची गाडी आमच्या गंगापूर हददीत चालते जर वाळु वाहतुकीला गाडी चालवायची असेल तर हप्ता दयावा लागल, पोलीस स्टेशनला हप्ता देता आण आम्ही डीवायएसपी ऑफीसचे असुन आम्हाला फाटयावर मारता का, फुकट चालवायला तुमच्या बापाच राज चाललय का आजच्या आज संध्याकाळी मला भेटा आणि हप्त्याचं ठरवुन हप्ता देऊन टाका. नाहीतर गाडीवर केस करुन टाकीन, तुम्ही लय डेंजर हाईत असे मला संगळे लोक सांगताय, संध्याकाळी जर भेटले नाही तर पुढचं बघुन घ्या काय होतंय ते असे बोलले त्यावेळी मी त्यांना किती हप्ता दयावा लागन असं बोललो तर त्यांनी समोर ये मंग सांगतो असे म्हणुन फोन कट केला.
पोलीस सुनिल राठोड यांना माझ्या गाडीने गंगापूर हददीतुन वाळु वाहतुक करण्यासाठी हप्ता देण्याची इच्छा नसल्यामुळे मी त्यानंतर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे हजर आलो आहे. माझी पोलीस सुनिल राठोड, डीवायएसपी ऑफीस गंगापूर यांना गाडीचा हप्ता म्हणुन पैसे दयायची इच्छा नाही. पोलीस सुनिल राठोड यांचेत व माझ्यात पैशाच्या देण्या घेण्याचा व्यवहार नाही, वैर दुश्मनी नाही. डीवायएसपी ऑफीस गंगापूर येथील पोलीस सुनिल राठोड यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी मला माझ्या वाळु वाहतुकीच्या हप्त्याचे म्हणुन पैशाची मागणी करुन ते पैसे स्विकारल्यास त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. आज संध्याकाळी पोलीस सुनिल राठोड यांनी मला बोलविल्याने त्यांना भेटायला गेल्यावर ते माझ्याकडे पैशाची मागणी करु शकतात त्याकरीता मी आजच संध्याकाळी आपणास फोन केल्यावर येऊन पुढील कारवाई करणेस विनंती आहे. अशा मजकुराची तक्रार पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छ.संभाजीनगर यांचेकडे दिली.

मी दिलेल्या वरील तक्रारीप्रमाणे दि.27/05/2024 रोजी रात्री अंदाजे पावणे दहा वाजेच्या सुमारास मला डीवायएसपी ऑफीस गंगापूर येथील पोलीस राठोड यांचा फोन आला व मला भेंडाळा फाटा येथे बोलविले. त्यावरुन मी पो.नि.घोडके साहेब यांना कारवाई करीता बोलविले त्याप्रमाणे पो.नि.घोडके साहेब, दोन्ही पंच, व सापळा पथक असे ईसारवाडी फाटयाजवळ लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या अनुषंगाने लागणाऱ्या साहित्यसह हजर झाले. त्या ठिकाणी पो.नि.घोडके साहेबांनी मला, दोन्ही पंच, व सापळा पथकाला लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने प्रक्रीया सांगुन सुचना दिल्या. त्यानंतर थोडयाच वेळात मला पोलीस राठोड यांचा फोन आला व तात्काळ भेटायला येण्याचे सांगितले.

त्यानंतर माझ्याजवळ व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर लपवुन दिला. व सोबत पंच क्र.1 यांना घेवून माझ्याकडील मोटार सायकलने पोलीस सुनिल राठोड यांचे भेटीसाठी मेंढाळा फाटा येथे दि. 28/05/2024 रोजी रात्रीचे 12.07 वाजता पाठविले. त्यानंतर मी व पंच क्र.1 मेंढाळा फाटा येथे मोटार सायकलने जात असताना रस्त्यात फोन आला व पोलीस राठोड यांनी मला डीवायएसपी ऑफीस गंगापुर येथे बोलविले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे डीवायएसपी ऑफीस गंगापुर येथे जाऊन तेथे पोलीस सुनिल राठोड यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस सुनिल राठोड यांचे सोबत साध्या कपड्यात दुसरा एक पोलीस होते. त्यांनी माझं नाव विचारलं. मी त्यांना माझं नाव सांगितलं. त्यानंतर आमच्यात माझ्या वाळुच्या गाडी विषयी चर्चा झाली. त्यावेळी सुनिल राठोड यांचे सोबतच्या पोलीसने पंच क्र.1 यांचे बाबत विचारणा केली तर मी त्यांना मित्र गावातले असे सांगितले. त्यानंतर पंच क्र.1 यांना बाहेर थांबायला सांगा असे मला सांगितले. त्यानंतर पंच क्र.1 यांना डीवायएसपी ऑफीस मधील एका रुमच्या बाहेर थांबविले. त्यावेळी सुनिल राठोड यांनी पंचाला बघुन बोलले की, मित्र कशाला सोबत आणले. असे म्हणुन मी डंपर हाय याबाबत चर्चा केली. व सुनिल राठोड यांनी गाडी भेटले तर चालतं.. पण मग ते हिशोब द्यायला, चुकता नां साहेबाला.. असं म्हणुन पोलीस स्टेशनला किती पैसे दिले याबाबत माहीती घेतली व पंधरा देणं पडून, पंधरा द्या असे बोलले. त्यावेळी मी त्यांना पंधरा हजार लई होऊ राहिले सर असे बोललो त्यावेळी सुनिल राठोड यांचे सोबतच्या पोलीसने माझे नाव विचारले मी माझे नाव सांगितले. व माझ्याकडे एकच गाडी असल्याची त्यांनी खात्री केली व किती देता मग..असे पैशाबाबत विचारणा केली. त्यावेळी तुमच्याच हिशोबाने सांगा तुम्ही.. साहेबाने पंधरा हजार सांगितले असे बोललो. त्यावेळी सुनिल राठोड यांच्या सोबतच्या पोलीस बोलले की, मग आम्ही झक खायची का.. असे बोलले. सुनिल राठोड यांनी मला 7620465391 हा मोबाईल नंबर दिला व मागणी केलेले पैसे उद्या (दि.28/05/2024 रोजी 12 वाजेपर्यंत देण्याचे सांगितले व नंतर उद्या दुपारी 2 वाजेपर्यंत देण्याचे सांगितले. व माझा मोबाईल नंबर व गाडीचा नंबर घेतला. माझ्या जेवणाबाबत व माझे वडीलांची काळजी घेण्याबाबत चर्चा झाली. पोलीस सुनिल राठोड यांचे सोबतच्या पोलीसाचे नांव मी विचारणा केली असता त्यांनी सपकाळ असे सांगितले. व त्यानंतर आम्ही तुमचं कधी नुकसान करनार नाही भाऊ वाईट ह्या गोष्टीचं वाटतं की, तुम्ही सपकाळांचं करता.. आण आमचं करत नाही.. हे सपकाळ मेन ऑफीस हाय असे म्हणुन 15,000/- रुपयांची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेथे माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यातील पो.नि.घोडके साहेबांनी व दोन्ही पंचांनी व सापळा पथकाने माझेत व पोलीस सुनिल राठोड व त्यांचे सोबतचा पोलीस यांचेती संभाषण ऐकले त्यात 15000/- रुपयांची लाचमागणी आलोसे सुनिल राठोड यांनी मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.28/05/2024 रोजी दुपारी 2 वाजता सुनिल राठोड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेऊन बोलविले असल्याने मी पो.नि.घोडके साहेबांना सुनिल राठोड व त्यांचे सोबतच्या पोलीस विरुध्द पुढील कारवाई करीता बोलविले त्याप्रमाणे घोडके साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक असे मेंढाळा फाटा (लालाजी हॉटेल) येथे अंदाजे दुपारी 3 वाजेच्या सुमारास हजर आले. तेथे सापळा कारवाईच्या पुढील कार्यवाहीबाबत माहीती देऊन सुचना दिल्या. व ऍन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट चे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षीत करुन दाखविले व त्यानंतर सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास मी माझ्या फोनवरुन सुनिल राठोड यांना फोन केला तर त्यांनी मला डीवायएसपी ऑफीस गंगापूर येथे बोलविले.

त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझ्या अंगावर लपवुन दिला व सोबत पंच क्र.1 यांना देऊन सुनिल राठोड यांना लाचेची रक्कम देण्यासाठी माझ्याकडील मो.सा.ने पाठविले. त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 डीवायएसपी ऑफीसच्या रोडवरील गेटच्या पश्चिम बाजुकडे रोडवर थांबलो. व आमच्या पाटोपाठ पो. नि.घोडके साहेब व सापळा पथक व पंच क्र.2 हे डीवायएसपी ऑफीस गंगापूरच्या आजु बाजुला दबा धरुन थांबले. त्यानंतर थोड्याच वेळात पोलीस सुनिल राठोड हे त्यांचेकडील मोटार सायकलवर माझ्या ओळखीच्या नसलेल्या व्यक्तीसह माझ्या जवळपास आले. सुनिल राठोड यांनी त्यांचे सोबतच्या व्यक्तीला माझ्याकडे पाठविले व स्वतः थोडया अंतराव त्यांचेकडील मोटार सायकल चालूच ठेवुन त्यावर बसुन होते. व हाताने नमस्कार करुन, त्या व्यक्तीकडे पैसे देण्याचा मला ईशारा केला. त्यानंतर तो व्यक्ती माझ्या जवळ आला व बोलला की, तुम्हालाच भेटायला आलतो..मी बोललो की, द्यायचे का साहेबाने सांगितले काय म्हणी..तो व्यक्ती बोलला की, द्यायचे का साहेबाने सांगितले काय म्हणी..असे म्हणुन मी माझ्या उजव्या खिशातील ऍन्थ्रॉसीन पावडर लावलेले 15,000/- रुपये त्या व्यक्तीच्या समोर धरल्या असता त्याने त्या उजव्या हाताने स्विकारुन स्वतः:च्या पॅन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवल्या व मी बोललो की, मोजुन घ्या..तो व्यक्ती बोलला की, ओके..मी बोललो मोजले. तो व्यक्ती बोलला तुम्ही हाय तुमच्यावर भरोसा आहे. असे म्हणुन पोलीस सुनिल राठोड यांचेकडे तो व्यक्ती जाण्यास निघाला तेवढ्यात मी पुर्व नियोजीत ठरलेला इशारा डोक्याचा पांढरा रुमाल डाव्या हाताने काढुन हातात घेतला ती वेळ सायंकाळी

07.15 वाजेची होती. तेवढयात पो.नि.घोडके साहेब व सापळा पथकातील सदस्य पोलीस सुनिल राठोड व त्यांचे सोबतच्या व्यक्तीला पकडण्याचा प्रयत्न करीत असताना पोलीस सुनिल राठोड हे त्या लाचेचे पैसे घेतलेल्या व्यक्तीला त्यांचे मोटार सायकलवर घेऊन सुसाट वेगाने पळुन गेले. त्यानंतर डीवायएसपी ऑफीस येथील पोलीसांकडुन सुनिल राठोड यांचे नांव सुनिल मुलचंद राठोड, व सपकाळ यांचे नाव लक्ष्मीकांत हरिचंद्र सपकाळ असल्याचे समजले तर सुनिल राठोड यांचे सोबतच्या इसमाचे नांव मला माहीत झाले नाही. परंतू तो इसम मला दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो.

तरी दिनांक 28/05/2024 रोजी रात्री 12.07 ते 12.50 वाजेच्या दरम्यान डीवायएसपी ऑफीस गंगापूर येथील कार्यालयात माझ्याकडे पंचासमक्ष पोलीस सुनिल राठोड व पोलीस लक्ष्मीकांत सपकाळ यांनी माझी वरील हायवा वाळु वाहतुकीसाठी चालु देण्यासाठी 15.000/- रुपयांची मागणी केली. व मागणी केलेली लाचेची रक्कम दि. 28/05/2024 रोजी सायंकाळी 07.15 वाजेच्या सुमारास डीवायएसपी ऑफीस गंगापूर च्या समोरील रोडकील पश्चिम बाजुला रोडवर पोलीस सुनिल राठोड यांनी त्यांचे मोटार सायकलवर आणलेल्या व मला अनोळखी असलेल्या इसमाने सुनिल राठोड यांच्या सांगण्यावरुन माझ्याकडुन स्वत: स्विकारली. म्हणुन माझी पोलीस 1) सुनिल मुलचंद राठोड, पोलीस 2) लक्ष्मीकांत हरिचंद्र सपकाळ, 3) सुनिल राठोड यांचे सोबत मोटार सायकलवर येऊन लाचेची रक्कम घेऊन जाणारा अनोळखी इसम यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Azhar Nasir Shaikh
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** PSI
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):
29/05/24
11.02

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे गंगापूर
जि.औरंगाबाद (ग्रामिण)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Satyajeet Sudhakar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSSTM8306